# डिड ऑफ असाईनमेंट

डिड ऑफ असाईनमेंट आज दिनांक ______ वार ________माहे

जुन सन २०२६ ईसवी ते दिवशी पुणे मुक्कामी

**श्री.अशिष मारूती हगवणे**

वय ः ४१ वर्षे धंदा ः शेती व व्यवसाय

पॅन नं.ः **ABOPH9462Q**

आधार नं.ः ९३०२ ७१९८ ११४५

रा ः गणपतनगर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक भवना समोर,

सिंहगड रोड, किरकटवाडी, ता. हवेली, जि.पुणे -४११०२४.

यापुढे यांचा उल्लेख सदरील दस्तात "**लिहुन देणार**" असा केलेला असुन प्रस्तुत दस्तातील सर्व मजकुर त्यांचे असाईनिज, वालीवारस, हक्कदार यांचेवर कायम स्वरूपी बंधनकारक राहणार आहे.

...........लिहुन देणार

**यांसी...**

**१.श्री.निलेश मारूती शेडगे**

वय ः ३३ वर्षे धंदा ः नोकरी

पॅन नं.ः **IVXPS6622C**

आधार नं.ः ६०३३ ९८२२ ७२३५

२.सौ.माया निलेश शेडगे

वय ः २९ वर्षे धंदा ः गृहिणी

पॅन नं.ः **UQVPS8235N**

आधार नं.ः ८७२० १२८४ ५२१५

दोघेही रा. रूम नं.२२६८,

समाज मंदिर जवळ, सिंहगड रोड,

किरकटवाडी, कोल्हेवाडी, ता.हवेली, जि.पुणे -४११०२४.

(यापुढे यांचा उल्लेख सदरील दस्तात **"लिहुन घेणार"**. असा केलेला असुन प्रस्तुत दस्तातील सर्व मजकुर त्यांचे असाईनिज, वालीवारस, हक्कदार यांचेवर कायम स्वरूपी बंधनकारक राहणार आहे.)

**कारणे डिड ऑफ असाईनमेंट लिहुन देतो की ः-**

**१. मिळकतीचे वर्णन ः**

**परिशिष्ट - अ**

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली जि.पुणे मे. दुय्यम निबंधक साहेब हवेली, जिल्हा परिषद पुणे, तसेच तालुका पंचायत समिती तालुका हवेली यांचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे **किरकटवाडी** येथील गट नं. ९२ यांसी एकुण क्षेत्र ०१ हे.०४ आर यांसी आकार रू. ०१.७४ पैसे पैकी ०० हे.७.५ आर, गट नं. ९३ यांसी एकुण क्षेत्र ०० हे.४९ आर यांसी आकार रू. ०१.०६ पैसे पैकी ०० हे.११ आर व गट नं. ९४ यांसी एकुण क्षेत्र ०० हे.२१ आर यांसी आकार रू. ००.४४ पैसे पैकी ००

हे.०६ आर असे एकुण क्षेत्र २४.५० आर.म्हणजेच २४५० चौ.मी.यासी चर्तूःसिमा ः

पुर्वेस ः श्री.पांडुरंग गंगाराम हगवणे यांची मिळकत

दक्षिणेस ः डी.एस.के.डेव्हलपर्स यांची मिळकत

पश्चिमेस ः सौ.सुजाता गुलाब हगवणे यांची मिळकत

उत्तरेस ः रस्ता

## परिशिष्ट - ब

वर परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या शुभंकर हाईटस् या प्रकल्पातील खालील वर्णनाची सदनिका.

| | | |
|---|---|---|
| बिल्डींगचे नाव | ः | शुभंकर हाईटस् सहकारी गृहरचना संस्था मर्यादित |
| बिल्डींग विंग | ः | विंग ए (A) |
| सदनिका क. | ः | क.३०५ |
| मजला | ः | तिसरा |
| कारपेट क्षेत्र | ः | क्षेत्र ४२२ चौ.फुट |
| कव्हर्ड कार पार्कींग क्षेत्र | ः | पार्कींग क.२ अंदाजे १००.स्के.फुट |

येणेप्रमाणे वर्णनाची निवासी सदनिका मिळकत त्यातील जल, तरू, तृण, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपासहित म्हणजेच सर्व तदंगभुत वस्तुंचे मालकी हक्कासह तसेच सदर मिळकतीत असणा-या सर्व ॲमेनिटीज, कॉमन जिना, टेरेस व पॅसेजसह त्यामध्ये जाण्यायेण्याचे वहिवाटीचे वापराचे मालकी

हक्कासह दरोबस्त मिळकत. ह्या पुढे प्रस्तुत दस्तात परिशिष्ट ब मध्ये नमूद सदनिका मिळकतीस **“सदर मिळकत”** असा उल्लेख केलेला आहे.

२.वर कलम १ परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेली मिळकत हि लिहुन देणार यांचे वडिलापार्जित मालकी हक्काने ताबे वहिवाटीमध्ये होती.तशी नोंद सदर मिळकतींचे ७/१२ सदरी आहेत.दिनांक २४.०९.२०१५ रोजीच्या दुय्यम निबंधक हवेली क.२३ यांचे कार्यालयात नोंदविलेल्या विकसन करारनामा दस्त क.७९४६/२०१५ व कुलमुखत्यारपत्रदस्त क.७९४७/२०१५ अन्वये सदर मिळकती हया सुरेखा लॅन्डमार्कस प्रा.लि.तर्फे संचालक गणेश बाळासाहेब हगवणे यांना वर नमुद केलेल्या विकसन करारनामा दस्त व कुलमुखत्यारपत्र दस्त यांच्यामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीवर विकसनासाठी दिलेली होती.सदर नमुद अटी व शर्तीनुसार लिहुन देणार यांच्यासह त्यांच्या कुटूंबियांना परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतींवर बांधण्यात येणा-या इमारतीतील मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे होणा-या एकुण बांधकामापैकी ४३ टक्के बांधकाम मोबदला म्हणुन देण्याचे मान्य व कबुल केलेले होते.

२.सुरेखा लॅन्डमार्कस प्रा.लि.तर्फे संचालक गणेश बाळासाहेब हगवणे यांनी लिहुन घेतलेल्या विकसन करारनामा व कुलमुखत्यारपत्रातील मिळालेल्या अधिकारांचा वापर करून सदर परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतींचे वर बांधावयाचे इमारतींचे आराखडे व बांधकाम नकाशे पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांचेकडे मंजूरीसाठी दाखल केले होते. त्या अनुशंगाने दिनांक ०४.१०.२०१६ रोजी सदर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र

विकास प्राधिकरण पुणे यांनी बांधकाम चालू करण्याकरिता दाखला क.जा.क.बीएचए/ प्र.क.६३५ / १६-१७/ मौ.किरकटवाडी दाखला दिल्यानंतर अपर जिल्हाधिकारी पुणे यांनी दिनांक ०४.०२.२०१७ रोजी महाराष्ट्र जमिन अधिनियम १९६६ चे अंतर्गत जमिनीच्या वापारात बदल व अकृषिक आकारणी करून सनद दिलेली आहे.सदर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांनी दिनांक ०८.०७.२०२२ रोजी जा.क.डीपी/ बीएचए/ मौ.किरकटवाडी/ ग.नं.९२,९३,९४ पै/ प्र.क.६३५ १६-१७ कमांक असलेले अंतिम भोगवटापत्र दिलेले आहे.

३.येणेप्रमाणे इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सुरेखा लॅन्डमार्कस प्रा.लि.तर्फे संचालक गणेश बाळासाहेब हगवणे यांनी लिहुन देणार यांना व त्यांच्या कुटूंबियांना दिनांक १०.०८.२०२२ रोजी नोंदणी क.१६१५० /२०२२ असलेला दुय्यम निबंधक हवेली क.१ येथे नोंदविलेला ताबापावती दस्त लिहुन व नोंदवुन दिलेला आहे. सदर दस्तातील अंतर्गत पृष्ठ क.९ व १० वर नमुद केल्याप्रमाणे लिहुन देणार यांच्या नावे विकसन करारनाम्याद्वारे येणा-या मोबदल्याचा उल्लेख केलेला असुन त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे वर कलम १ मधील परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेली मिळकत हि लिहुन देणार यांना मिळालेली असुन सदर मिळकतीचे लिहुन देणार हेच कायदेशीर मालक आहेत. सदर मिळकत विकण्याचा किंवा तीचा हवा तसा उपभोग घेण्याचा अधिकार लिहुन देणार यांना नोंदणीकृत विकसन करारनाम्याद्वारे व नोंदणीकृत ताबा पावती दस्ताद्वारे मिळालेला आहे.

४. सदर मिळकत लिहुन देणार यांनी आदर्श नागरी सहकारी पतसंस्था अलिबाग (पुर्वाश्रमीची सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कोथरूड) या बॅंकेकडे तारण ठेवुन कर्ज घेतले सदर मिळकतीच्या प्रस्तुत व्यवहारातुन मिळणारा मोबदला कर्जफेड म्हणुन लिहुन देणार करणार असुन त्यांना त्या आशयाचे सदर आदर्श नागरी सहकारी पतसंस्था अलिबाग यांच्यातर्फे दिनांक १५.०६.२०२६ रोजीचे पत्र मिळाले असुन सदर पत्र प्रस्तुत दस्तास जोडले असुन त्यास दस्ताचा भाग म्हणुन वाचण्यात यावे. या व्यतिरीक्त लिहुन देणार यांचा कुठल्याहि प्रकारचा अन्य बोजा सदर मिळकतीवर नसुन सदर मिळकत हि या व्यतिरीक्त कुठल्याही बॅंकेस अथवा कोणत्याही इसमांस गहान, दान बक्षिस लिज खरेदी अन्न वस्त्र पोटगी निवारा अथवा इतर कोणत्याही स्वरूपात तबदील करून दिलेली नाही.अगर तसा कोणाबरोबरही तोंडी अथवा लेखी करार केलेला नाही.सदर मिळकत हि कोणत्याही कारणास्तव कोणत्याही न्यायालयात वादाचा विषय नाही. यदाकदाचीत वर नमुद बॅंके व्यतिरिक्त अन्य कोणत्याहि बॅंकेचा बोजा अथवा कोणत्याही ति-हाईत इसमाचा अथवा संस्थेचा बोजा सदर मिळकतीवर निघाल्यास तो लिहुन देणार यांनी स्वतः लिहुन घेणार यांना कोणत्याहि प्रकारची तोषिस न देता भरण्याचा आहे.

५. लिहुन देणार यांना सदर सदनिका मिळकत विकण्याची इच्छा असुन लिहुन घेणार यांना आपल्या भागात आपल्या कुटंबाला राहण्यासाठी सदनिकेच्या शोधात असताना त्यांना लिहुन देणार यांच्या सदर मिळकतीबाबत समजले असता लिहुन घेणार यांनी सदर मिळकत हि लिहुन देणार यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे लिहुन देणार व घेणार यांच्यामध्ये

झालेल्या प्रदिर्घ चर्चे नंतर सदर मिळकत आजच्या बाजारभावामध्ये सदर मिळकत हि लिहुन देणार यांनी विकण्याचे ठरविले व सदरील दस्ताने लिहुन घेणार यांनी सदर मिळकत कायमखुष खरेदी करण्याचे ठरविले.

६. सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध निजोखमी असुन सदर मिळकत हस्तांतरण करणेचा संपुर्ण अधिकार लिहुन देणार यांना आहे. सदरील मिळकत ही लिहुन देणार यांचे तावेवहिवाटीस असुन लिहुन देणार यांचेशिवाय कोणाचाही हक्क हितसंबंध, ताबा वहिवाट नाही. लिहुन देणार हे सदरील मिळकतीचे पुर्णपणे कायदेशीर मालक असल्याने सदरील मिळकत विकी करण्याचा अथवा अन्य मार्गाने तबदील करण्याचा अधिकार लिहुन देणार यांना आहे.

७. सदर मिळकतीचे संदर्भातील सर्वप्रकारचे मिळकतीचे कागदपत्रे लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दाखवलेले आहेत. सदर मिळकतीचे कागदपत्रे हे लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दिलेले आहेत.तसेच सदर मिळकतीचे होणारे खरेदीखताचा संपुर्ण खर्च म्हणजेच स्टॅम्प डयुटी,रजिस्ट्रेशन फी, वकील फी, व इतर तदनुषंगिक सर्व खर्च हा लिहुन देणार यांनी करावयाचा आहे व तसे लिहुन देणार यांनी मान्य व कबुल केले आहे. सदर मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा लिहुन देणार यांनी लिहुन घेणार आज रोजी देण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच सदर दस्तापोटी लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना सदर मिळकतीचे व्यवहारपोटी ठरलेली संपुर्ण रक्कम दिलेली आहे.

८.सदर मिळकतीचे ग्रामपंचायत कर, महानगरपालीकेचे कर व इतर सर्व प्रकारचे कर लिहुन देणार हे स्वतः मालक म्हणुन भरत आहेत. यापुढील सदर मिळकतीचे येणारे सर्व कर लिहुन घेणार यांनी भरण्याचे असुन लिहुन देणार यांना त्याबाबत कोणत्याही प्रकारची तोषिस लागु देण्याची नाही.तसेच यापुर्वीचे अन्य कोणतेही करांचा भरणा बाकी असल्यास त्याची भरण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहुन देणार यांची आहे.त्याबाबतची कोणतीही तोषिस लिहुन घेणार यांना लागु देण्याची नाही.

९.सदर मिळकतीचा मोबदला म्हनुन लिहुन घेणार हे लिहुन देणार यांना खालील प्रमाणे नमुद केलेल्या भरणा तपशीलाप्रमाणे मोबदला देणार असुन तो लिहुन देणार यांना व त्यांचे वाली वारसांना मान्य व कबुल आहे.

| अ.क्र. | रक्कम | तपशिल |
|---|---|---|
| १. | रू.२३,00,000/- | लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना चेक क. ........... दि. ........... रोजीचा ......... बॅंक शाखा .................... चा दिला असुन लिहुन देणार यांना तो मिळाला असुन त्याबद्दल यांची कुठलीही तकार नाही. |

येणेप्रमाणे वरील भरण्या बद्दल लिहुन घेणार व लिहुन देणार यांची कोणतीही तक्रार नाही. सदरचा भरणा लिहुन देणार यांना मिळाला असुन त्याबाबत कोणाचीही कसलीही तक्रार नसुन वेगळया भरणा पावतीची गरज नाही.

१०. आज रोजी सदर दस्ताने लिहुन घेणार हे सदर मिळकतीचे मालक झालेले असुन सदर मिळकतीचा लिहुन घेणार यांनी त्यांच्या वंशपरंपरेने व मालकी हक्काने उपभोग घ्यावा अथवा मर्जीप्रमाणे व्यवस्था अगर विल्हेवाट करावी. लिहुन घेणार यांचे मालकी वहिवाटीस ताब्यास व उपभोगास लिहुन देणार यांचे कोणी भाऊ, भाऊबंद, सावसावकार, वालीवारस, भागीदार, प्रोप्रायटर इत्यादी कोणीही हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण लिहुन देणार यांनी त्यांचे स्वखर्चाने करून देतील लिहुन घेणार यांना त्याची तोषीस लागु देणार नाही. लिहुन घेणार यांनी सदर दस्तास अनुसरून त्यांचे नावाची नोंद मालक सदरी मिळकतीच्या मालकी कागदोपत्री सदरी इतर सरकारी कागदोपत्री लावुन घेण्यासाठी लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना विनामोबदला सही संमती विनाविलंब देतील तसेच संबंधीत नोंदणी अधिका-यापुढे विनाविलंब हजर राहुन जाव जबाब देतील सहया संमत्या विनामोबदला देतील.

११. या दस्ताचा व्यवाहार हा कायम स्वरूपी असुन उलट खरेदीची कोणत्याही प्रकारची बोली नाही. तसेच सदरचा व्यवहार हा लिहुन घेणार व लिहुन देणार यांचेवर व त्यांचे वाली वारसांवर तसेच त्यांचे तर्फे हक्क सांगणा-या सर्व व्यक्तींवर बंधनकारक आहे व राहिल.

१२ . येणेप्रमाणे सदरचे डिड ऑफ असाईनमेंट लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना राजीखुषीने व अक्कल हुषारीने लिहुन दिलेले असुन ते आपल्या सुचनांप्रमाणे योग्य व बरोबर तयार करण्यात आले आहे. हे मोठयाने वाचुन व समजावुन घेवुन त्यावर लिहुन देणार व लिहुन घेणार यांनी दोन साक्षिदारांसमक्ष सहया केल्या असुन अंगठे उमटविलेले आहे.

| नावे | सही | अंगठा | फोटो |
|---|---|---|---|
| श्री. अशिष मारूती हगवणे<br>लिहुन देणार | | | |
| श्री.निलेश मारूती शेडगे<br>लिहुन घेणार | | | |
| सौ.माया निलेश शेडगे<br>लिहुन घेणार | | | |

साक्षीदार ः

| | |
|---|---|
| १. सही | २. सही |
| नाव | नाव |
| पत्ता | पत्ता |

*******